**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि.**

**दिनांक:25.05.2025** **वारः रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. भविष्यात तयार होत असलेल्या, शहरांवर काम करण्याची आवश्यकता असल्याचं पंतप्रधानांच प्रतिपादन.
2. राज्यात कोरोना रुग्णसंख्येत वाढ, गेल्या २४ तासांत आणखी ४५ रुग्ण आढळले.
3. रत्नागिरी जिल्ह्यातल्या पूर्णगड सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतल्या, १३ बांगलादेशी नागरिकांचं प्रत्यार्पण.

आणि

4. नैऋत्य मान्सूनने केला भारतीय उपखंडात प्रवेश.

**नीती**

जागतिक मानकांनुसार, राज्यांना सर्व सुविधा तसंच पायाभूत सुविधांची पुरवठा करून, प्रत्येक राज्यात किमान एक पर्यटन स्थळ विकसित करण्याचे आदेश, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले आहेत. काल नवी दिल्लीमध्ये नीती आयोगाच्या नियामक परिषदेच्या दहव्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. “ विकसित राज्य, विकसित भारत दोन हजार 47” ही या मागील संकल्पना असून उद्योजकता, कौशल्य वाढवणे आणि देशभर टिकाऊ रोजगार संधी निर्माण करणे या मुद्द्यांवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. भविष्यातील शहरांवर काम करण्याची आवश्यकता असल्याचं सांगताना मोदी यांनी जलद शहरीकरणाच्या प्रक्रियेवर या वेळी प्रकाश टाकला.

**मुख्यमंत्री**

महाराष्ट्र, विकसित भारत-२०४७' चं उद्दिष्ट गाठण्यासाठी, केंद्र तसंच सर्व राज्यांसोबत संपूर्ण क्षमतेनं सज्ज असून विकास आणि वारसा, स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी महाराष्ट्र सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. राज्यासाठी आवश्यक ५२ टक्के ऊर्जा २०३० पर्यंत हरित स्रोतांतून निर्माण केली जाईल. शहरांमध्ये औद्योगिक विकासाला चालना देण्याच्या प्रयत्नांतून आता गडचिरोली ही स्टील सिटी, नागपूर हे संरक्षण हब म्हणून विकसित करण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितल.

**कोरोना**

राज्यात गेल्या २४ तासांत कोरोना ४५ रुग्ण आढळले आहेत. राज्यात सर्वाधिक ३५ रुग्ण मुंबईत असून, पुण्यातही ४ जणांना संसर्ग झालेला आहे. या महिन्यात कोरोनाचे एकंदर १७७ रुग्ण आढळले आहेत. राज्यात १ जानेवारी ते २३ मेपर्यंत कोरोनाच्या ६ हजार ८१९ संशयित रुग्णांच्या चाचण्या करण्यात आल्या. त्यात २१० रुग्णांना कोरोनाचं निदान झालं आहे.

**उपमुख्यमंत्री**

पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था प्रकल्पामुळं, उच्च दर्जाच्या, आदर्श मानांकन प्रणालीनं उत्पादित लसी पशुपालकांना उपलब्ध होतील अस प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पुण्यात केले. काल पुण्यात पवार यांच्या हस्ते जैव सुरक्षा प्रयोगशाळा तसंच राष्ट्रीय संदर्भीय लस चाचणी गुणनियंत्रण प्रयोगशाळा आणि सुपर स्पेशालिटी व्हेटरनरी हॉस्पिटलच्या उद्घाटन करताना बोलत होते. पाळीव प्राण्यांसाठी सुपर स्पेशालिटी पशुवैद्यकीय रुग्णालयाची उभारणी करण्यात आली असल्याचं हा संपूर्ण प्रकल्प पशुसंवर्धन आणि मानवी जीवनाच्या आरोग्याच्यादृष्टीने लाभदायक ठरेल अस पवार यावेळी म्हणाले.

**बांगलादेशी**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या पूर्णगड सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदा वास्तव्य करत असलेल्या १३ बांगलादेशी नागरिकांचं प्रत्यार्पण त्यांची सहा महिन्यांची शिक्षा पूर्ण झाल्यानंतर करण्यात आलं आहे. पोलिसांच्या दहशतवादविरोधी पथकाने ११ नोव्हेंबर २०२४ रोजी टाकलेल्या छाप्यात हे नागरिक आढळले होते. पारपत्र आणि परदेशी व्यक्ती अधिनियमांतर्गत त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. जिल्ह्याचे मुख्य न्यायदंडाधिकारी निखिल गोसावी यांनी त्यांना सहा महिने साधी कैद आणि पाचशे रुपये दंडाची शिक्षा सुनावली होती.

**अटल**

पुणे महापालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाला राष्ट्रीय वैद्यकीय आयोगानं त्रुटींची पूर्तता न केल्यास मान्यता रद्द का करू नये? अशी कारणं दाखवा नोटीस बजावली आहे. गेल्या चार वर्षात या महाविद्यालयामध्ये पुरेसे प्राध्यापक तसच फॉरेन्सिक विभाग नाही. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह नाही याकडे आयोगानं लक्ष वेधलं आहे.

**मनकीबात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरील मन की बात कार्यक्रमातून आपले विचार मांडणार आहेत. या कार्यक्रमाचा हा १२२ वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शन, आकाशवाणी संकेतस्थळ आणि न्यूजऑन आयआर या मोबाईल ॲपवर प्रसारित केला जाईल. आकाशवाणी न्यूज, डीडी न्यूज, पंतप्रधान कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनेलवर त्याचं थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे. त्यानंतर हा कार्यक्रम प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारित होणार आहे.

**V/C**

**कर्करोग**

रत्नागिरीत काल कर्करोगाचं निदान करणारं फिरतं रुग्णालय म्हणजेच कॅन्सर डायग्नॉस्टिक व्हॅनचं लोकार्पण पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांच्या हस्ते झालं. हे फिरतं रुग्णालय आणि कर्करोग तपासणीच्या महिनाभर चालणार असलेल्या या मोहिमेविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

*कर्करोग अर्थात कॅन्सर हे नाव ऐकलं तरी भीती वाटते. कर्करोग भीतिदायक असला, तरी त्याचं निदान लवकरच्या टप्प्यात झाल्यास त्यावर मात करता येऊ शकते. म्हणूनच प्रामुख्याने ग्रामीण आणि दुर्गम भागातल्या नागरिकांना डोळ्यांसमोर ठेवून रत्नागिरी जिल्हा आरोग्य विभागामार्फत अत्याधुनिक कर्करोग निदान व्हॅन अर्थात फिरत्या रुग्णालयाची व्यवस्था करण्यात आली आहे. २६ मे ते २८ जून या कालावधीत ही कर्करोग निदान व्हॅन सर्व तालुक्यांमधली ग्रामीण रुग्णालयं, उप-जिल्हा रुग्णालयं आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांवर जाणार आहे. कर्करोगाविरुद्धच्या लढ्यात लवकर निदान ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे तीस वर्षांवरच्या सर्व नागरिकांनी कर्करोग निदानाची ही मोफत तपासणी करून घ्यावी, असं आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भास्कर जगताप आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये यांनी केलं आहे.*

*आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, अनिकेत कोनकर, रत्नागिरी*

**V/C**

**मॉन्सून**

या वर्षी नैऋत्य मान्सूनने भारतीय उपखंडात लवकर प्रवेश केला आहे, तो केरळमध्ये काल म्हणजे १ जूनला होणाऱ्या त्याच्या सामान्य आगमनाच्या आठ दिवस आधी पोहोचल्याचं भारतीय हवामान विभागानं सांगितलं. काय आहेत त्यामागील कारणं, एक वृत्तांत...

यापूर्वी २००९ मध्ये, २३ मे रोजी मॉन्सून केरळमध्ये दाखल झाला होता. यावर्षी लवकर येण्याच्या कारणांची मीमांसा हवामान विभागानं केली आहे. तीन प्राथमिक निर्देशकांच्या आधारे केरळमध्ये मान्सूनचे आगमन घोषित केलं जातं: सलग दोन दिवस किमान १४ हवामान केंद्रांवर किमान अडीच मिलिमीटर पाऊस, ६०० हेक्टोपास्कलपर्यंत पसरलेले खोल पश्चिमेकडील वारे आणि २०० वॅट प्रति चौरस मीटरपेक्षा कमी लांबीच्या लाँगवेव्ह रेडिएशन मूल्यांमध्ये घट हे ते निर्देशांक आहेत. कोकण-गोवा किनाऱ्यावरील एक स्पष्ट कमी दाबाचा पट्टा शनिवारी कमी दाबाच्या पट्ट्यात तीव्र झाला आणि तो रायगडजवळ धडकण्याची अपेक्षा आहे. अरबी समुद्रात आधीच वादळी वारे आणि जोरदार मान्सूनचे प्रवाह वाहत होते. या वर्षी, हवामान विभागानं पाऊस "सामान्यपेक्षा जास्त" असण्याचा अंदाज वर्तवला आहे, म्हणजे ८८० मिलिमीटरच्या दीर्घकालीन सरासरीच्या १०५ टक्के असण्याचा अंदाज आहे. दोन प्रमुख सागरी प्रभाव - एल निनो-दक्षिणी दोलन आणि हिंद महासागर द्विध्रुवीय प्रभाव सध्या तटस्थ अवस्थेत आहेत, परिणामी मान्सूनच्या हालचालीला पाठबळ मिळण्याची शक्यता आहे. २९ मे ते ४ जून दरम्यान मान्सून दक्षिण द्वीपकल्पीय आणि

ईशान्य भारतातील उर्वरित भागांसह पूर्व आणि मध्य भारतातील अतिरिक्त भागात पुढे जाण्याचा अंदाज आहे. मॉन्सूनची लवकर सुरुवात देशभरातील शेती, जलसंपदा आणि आर्थिक स्थिरतेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या चार महिन्यांच्या पावसाळी हंगामाच्या सुरुवातीचा संकेत आहे.

आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.

**पाऊस**

सिंधुदुर्गात कालही पावसाचा जोर कायम होता, या पावसाने महावितरणचं ५३ लाखाचं नुकसान झालं आहे. जिल्ह्यातले सर्व घाट मार्ग सुरळीत सुरु असल्याची माहिती आपत्ती विभागान दिली असून जिल्ह्यातली ४१४ गावं प्रभावित झाली असून त्यातल्या ३८३ गावात वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्ह्यात पावसाचा जोर काल कमी झाला आहे. सांगली जिल्ह्यात मात्र पालेभाज्या आणि फळबागांचं नुकसान झालं असून कृष्णा नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे.

**कृषिमंत्री**

शेतीला प्रोत्साहन म्हणून शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक करण्यासाठी दरवर्षी पाच हजार कोटी रुपये याप्रमाणे पुढील 5 वर्षात 25 हजार कोटी रुपये देण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतला आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काल पुण्यात केले. प्रगतशील आणि प्रयोगशील शेतकऱ्यांच्या परिसंवादात बोलताना ही माहिती दिली.

**क्रिकेट**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या निवड समितीनं बोर्ड पुढच्या महिन्यात होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या क्रिकेट कसोटी मालिकेसाठी काल संघाची घोषणा केली. शुभमन गिलची भारतीय संघाचा कसोटी कर्णधार म्हणून निवड झाली आहे. पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना २० जूनपासून लॉर्डसवर होणार आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्या कसोटी निवृत्तीनंतर एका नवीन युगाची अपेक्षा असून करुण नायर या फलंदाजाने तब्बल ८ वर्षानंतर कसोटी संघात पुनरागमन केलं आहे. बी साई सुदर्शन आणि अर्शदीप सिंग यांची प्रथमच कसोटी संघात निवडण्यात करण्यात आली आहे.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेटमध्ये काल दिल्ली डेअर डेव्हिल्सने किंग्ज इलेव्हनचा ६ गडी राखून पराभव केला. दिल्लीने समीर रिझवीच्या २५ चेंडूतील नाबाद ५८ धावांच्या जोरावर २०६ धावांचं आव्हान ३ चेंडू राखून पार केलं.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.